ePaper
|वर्ष - 7 | अंक - 205 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | रविवार, दिनांक 3 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## पाच हजार शाळा दत्तक देणार, शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांची घोषणा!



### आतील पानांत


- आयपीएलचा सर्वांत रोमांचक मुकाबला!
- दिनेश फडणीस व्हेंटिलेटरवर
- नव्या वर्षात कर्मचाऱ्यांना मोठी भेट!
- राजेश टोपे यांच्या कारवर हल्ला!


# पक्ष फोडणाऱ्यांबद्दल जनतेत चीड!

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे प्रतिपादन

|पिंपरी | महाईन्यूज |

**पिंपरीः शिवसेना पक्ष फोडला, नंतर राष्ट्रवादी (NCP)काँग्रेसला फोडले. अनेकजण खासगीत परत येणार असल्याचे सांगतात. ते सोडा पण दीड वर्षात पक्ष फोडण्याचे पाप, कपटीपणा कोणी केला, हे जनतेच्या लक्षात येत आहे. त्यामुळे या लोकांमध्ये जनतेमध्ये चीड निर्माण होत आहे. या लोकांना आगामी काळात जनता धडा शिकवेल, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केले. पिंपरी-चिंचवड शहर राष्ट्रवादी काँग्रेसने पिंपरीतील (NCP)शनि मंदिरालगत मध्यवर्ती पक्ष कार्यालय सुरु केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून अजित पवारांच्या बालेकिल्ल्यात जोरदार शक्ती प्रदर्शनही करण्यात आले. या कार्यालयाचे पाटील यांच्या हस्ते शनिवारी उद्घाटन झाले. त्यानंतर झालेल्या मेळाव्यात पाटील बोलत होते.**




यावेळी खासदार डॉ. अमोल कोल्हे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मेहबुब शेख, ज्येष्ठ नेते आझम पानसरे, सुनील गव्हाणे आदी उपस्थित होते. जयंत पाटील म्हणाले की, पिंपरी-चिंचवडचा विकास शरद पवार यांनी केला हे शहरातील जनतेला माहिती आहे. झोपडपट्टीमधील नागरिकांना हक्काची घरे दिली. कोणीही पक्ष सोडून गेले तरी काय फरक पडत नाही. कारण, शरद पवार यांच्यासारखे मोठे विद्यापीठ आहे. पक्षाच्या स्थापणेच्या 25 वर्षांत साडे सतरा वर्षे पक्ष सत्तेत होता. विचारधारा न सोडता पक्ष सत्तेत राहिला.

विचाराचे राजकारण करत आहोत. पवार साहेबांनी पक्षाची नौका बुडू दिली नाही. आपण घाबरायचे नाही, आपण होतो तिथेच आहोत. सत्ता येते आणि जाते त्याची कोणी चिंता करू नका, राज्यातील जनता शरद पवार यांच्यासोबत आहे. आगामी काळात महापालिकेत नवीन चेहरे आणण्याची अभूतपूर्व संधी आहे. त्यामुळे घाबरून जाऊ नका, काम करत रहावे. जे गेलेत त्यांच्याबाबत बोलू नका, ते काय बोलतात हे जनता बघत आहे. माणसे जोडण्याचे काम करत रहावे.



> “ राष्ट्रवादी पक्षातून गेलेल्यांची चिंता करण्यापेक्षा सोबत असलेल्या कार्यकर्त्यांचे योग्य संघटन करून पुन्हा नव्या जोमाने काम करत पक्षाची मजबूत बांधणी करायची आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहरांमध्ये ज्या सुधारणा झाल्या त्यामध्ये शरद पवारांचा मोलाचा वाटा आहे. महाराष्ट्रातील जनता लय अवघड आहे, लोक विचार करून मतदान करतात. येत्या निवडणुकीत जनता महायुतीला धूळ चारल्याशिवाय राहणार नाही.
>
> **–जयंत पाटील ,** राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष

### पिंपरीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन

प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन संपन्न झाले. यावेळी पिंपरी चिंचवडचे शहराध्यक्ष तुषार कामठे, जेष्ठ नेते आझम पानसरे, माजी नगरसेविका सुलक्षणा शीलवंत यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. पिंपरी चिंचवड शहरावर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजितदादा पवार यांचा कायम वरचष्मा राहिला आहे. राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतरही अजित पवार गटातचं प्राबल्य शहरात दिसत होतं. मात्र शरद पवार गटानेही पिंपरी चिंचवडकडे विशेष लक्ष केंद्रित केल असून शहराच्या मुख्य असलेल्या पिंपरी चौकात अजित पवार गटाच्या कार्यालयासमोरच राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाने कार्यालय सुरू केले आहे. या कार्यालयाचे उद्घाटन राष्ट्रवादीचे जयंत पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले.

# दिव्यांग मतदारांच्या नोंदणीसाठी चिंचवडमध्ये विशेष मोहिम!

## जास्तीत जास्त पात्र दिव्यांग नागरिकांनी नोंदणी करावी; मतदार नोंदणी अधिकारी नीलेश देशमुख

| पिंपरी |महाईन्यूज | प्रतिनिधी|

**निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार यापूर्वी मतदानापासून वंचित राहिलेल्या दिव्यांग मतदारांसाठी चिंचवडमध्ये उद्या रविवारी (दि.३) रोजी मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती २०५ चिंचवड विधानसभा मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी तथा कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी दिली आहे. या मोहिमेचा जास्तीत -जास्त दिव्यांग नागरिकांनी लाभ घेऊन नोंदणी करावी, असे आवाहनही देशमुख यांनी केले आहे.**

चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात सकाळी रविवारी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत दिव्यांग मतदारांसाठी SPECIAL CAMP FOR VOTERS REGISTRATION आयोजित केला आहे. भारत निवडणूक



आयोगामार्फत दि. १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदानापासून वंचित राहिलेल्या दिव्यांग बांधवांचे नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यात येणार आहे.

### ही कागदपत्रे जोडावी लागणार..

फॉर्म जमा करताना दिव्यांग प्रमाणपत्र व रहिवाशी पुरावे जोडणे आवश्यक आहे. (फॉर्म नंबर ६ व 8 साठी – रहिवासी पुरावा, पत्याचा पुरावा लाईट बिल/पाणी पट्टी, आधार कार्ड, बँकेचे किंवा पोस्टाचे पास बुक, भारतीय पारपत्र, नोंदणीकृत विक्रीखत, नोंदणीकृत भाडेकरार वयाचा पुरावा जन्म प्रमाणपत्र, आधारकार्ड, राज्यशिक्षण मंडळाने निर्गमित केलेले 10 वी किंवा 12 वी चे प्रमाणपत्र.

### हे फॉर्म भरुन द्यावे लागणार..

- (फॉर्म नं 6 ) नवीन मतदार नोंदणी करीता
- (फॉर्म नं 6A ) परदेशी मतदार म्हणून नोंदणी करीता
- (फॉर्म नं 6B) विद्यमान मतदारांव्दारे आधार क्रमांकाची माहिती
- (फॉर्म नं 7 ) आक्षेप आणि स्वतः हटवणे
- (फॉर्म नं 8 ) दुरुस्ती/ शिफ्टिंग / डुप्लिकेट EPIC तसेच दिव्यांग व्यक्ती म्हणून चिन्हांकित करण्यासाठी अर्ज करावेत.

फॉर्म नंबर 7 साठी नाव वगळावयाचे व्यक्तीचा मृत्यु दाखला, लाईट बिल/ पाणी पट्टी, आधारकार्ड, बँक किंवा पोस्टाचे पास बुक, भारतीय पारपत्र, नोंदणीकृत विक्रीखत, नोंदणीकृत भाडेकरार द्यावा लागणार आहे.

# अजित पवारांची भूमिका सुसंगत नव्हती

## » प्रफुल पटेलांनी ईडीच्या कारवाईवर पुस्तक लिहावं

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**यांनी काही गौप्यस्फोट केलेत त्यातील बऱ्याच गोष्टी मला पहिल्यांदाच कळल्या, असं राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार (SHARAD PAWAR) म्हणाले. शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेले गौप्यस्फोट, राज्यातील पाणी टंचाई आणि अतिवृष्टी याबाबत भाष्य केलं.**





उपमुख्यमंत्री अजित पवार (Ajit Pawar) यांनी केलेल्या गौप्यस्फोटानंतर, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार (Sharad Pawar) यांनी उत्तर दिलं. अजित पवारांनी लोकसभेच्या (Lok Sabha Election) चार जागा लढवण्याची घोषणा केली. त्यावरही शरद पवारांनी भाष्य केलं. ते पुण्यात बोलत होते. यावेळी राष्ट्रवादीचे नेते एकनाथ खडसे, अनिल देशमुख, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे सुद्धा उपस्थित होते. पक्षाचा अध्यक्ष मीच होतो, माझी भूमिका स्पष्ट होती, भाजप बरोबर जायचं नव्हतं. भाजपसोबत जाण्याची भूमिका आमची नव्हती. अजित पवारांची भूमिका आमच्याशी सुसंगत नव्हती. मी राजीनामा देण्याचं कारण काय होतं? मी पक्षाचा अध्यक्ष होतो. माझ्या राजीनाम्याचा निर्णय सामूहिक झाला होता. भाजपसोबत जायचं नाही ही आमची भूमिका होती. ज्यांना जायचं होतं ते त्यांच्यासोबत गेले. मी त्यांना कधीच बोलावलं नाही, असं शरद पवार म्हणाले. अजित पवार यांच्या गौप्यस्फोटावर शरद पवार म्हणाले, "त्यातील बऱ्याच गोष्टी मला पहिल्यांदाच समजल्या. ज्या मागण्या केल्या होत्या त्या संबंधीची चर्चा झाली होती. मात्र तो रस्ता आम्हाला मान्य नव्हता. आम्ही भाजपमध्ये जाण्यासाठी लोकांची मतं मागितली नव्हती. जी आमची भूमिका होती त्याला लोकांचा पाठिंबा होता. त्यांनी निवडलेला रस्ता म्हणजे लोकांची फसवणूक आहे". पक्षाचा अध्यक्ष मी होतो. सामूहिक निर्णय झाला होता. भाजपबरोबर जायला नको ही स्पष्ट भूमिका होती. मला आनंद परांजपे किंवा जितेंद्र आव्हाडांची मदत घेण्याची गरज नाही. माझी स्वत:ची निर्णय घेण्याची कुवत आहे. लोकांच्या समोर जायचं असेल तर लोक जी भूमिका घेतील ती मान्य करावी लागेल. काहीही स्टेटमेंट केलं त्याचा स्वीकार मी का करायचा? त्यांनी राजकीय निर्णय घेतला तो त्यांचा अधिकार आहे, फक्त त्यांनी राष्ट्रवादीच्या नावावर मत मागितलं. त्याच्याशी विसंगत भूमिका त्यांनी घेतली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे खासदार प्रफुल पटेल यांनी आपण लवकरच पुस्तक लिहून गौप्यस्फोट करणार असल्याचं म्हटलं होतं. त्यावर शरद पवार म्हणाले, पटेलांच्या पुस्तकाची मी वाट बघतोय. प्रफुल पटेलांकडे पुस्तक लिहिण्यासाठी अनेक मुद्दे आहेत. पटेलांनी लोक पक्ष सोडून का जातात, यावर त्यांनी पुस्तक लिहावं. ईडीच्या कारवाईवरही त्यांनी पुस्तक लिहावं.

### पाहिजे ते मंत्रीपद द्यायला सुद्धा तयार


» ज्यांनी मला फसवलं (भाजप) त्यांच्यासोबत मला जायचं नव्हतं. आमच्यासोबत चला म्हणून माझ्या घरी हसन मुश्रीफ पाच तास बसून होते. मला पाहिजे ते मंत्रीपद द्यायला सुद्धा तयार होते, असा दावा अनिल देशमुख यांनी केला. राज्याच्या काही जिल्ह्यांमध्ये दौरे झाले. त्यांच्या पाहण्यांमध्ये दोन गोष्टी दिसल्या. दुष्काळी परिस्थिती आहे, पाणी टंचाई आहे. काही भागात अतिवृष्टी झाली आहे. मोठं नुकसान झाले. येत्या अधिवेशनात ही भूमिका मांडली जाईल. त्याआधी मुख्यमंत्री यांनी वेळ दिला तर आम्ही जाऊन भेटणार. हे सगळे प्रश्न त्यांच्यासमोर मांडणार आहोत. सरकारसोबत जा, मी राजीनामा देतो असं शरद पवार (म्हणाल्याचा गौप्यस्फोट उपमुख्यमंत्री अजित पवारांनी केला होता. शरद पवार यांनीच सत्तेत सहभागी व्हावं असं सांगितलं होतं. शरद पवार यांची सातत्याने धरसोडवृत्ती सुरू होती.

# जलप्रदूषणाबाबत प्रशासन गंभीर नाही का?

## » आळंदीत अकरा डिसेंबरला ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लाखो वारकऱ्यांचं श्रद्धास्थान असलेल्या आळंदीत इंद्रायणी नदी पुन्हा एकदा जलप्रदूषणाच्या विळख्यात अडकली आहे. संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. अशातच पुन्हा एकदा इंद्रायणी नदी फेसाळली आहे. नदीमध्ये रसायनयुक्त पाणी सोडलं गेल्याने हे प्रदूषण होत असल्याचा आरोप आळंदीकरांनी केला आहे. गेल्या काही दिवसांमध्ये इंद्रायणी नदीमध्ये वारंवार रसयानुक्त फेस येत असल्याचं दिसून येत आहेत. यासंबंधी प्रशासन देखील गंभीर नसल्याचे चित्र अधोरेखित होत आहे.**





येत्या नऊ डिसेंबरला आळंदीमध्ये कार्तिकी वारी सोहळा होणार आहे. तर अकरा डिसेंबरला ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा पार पडणार आहे. या सोहळ्यासाठी राज्यभरातून लाखो वारकरी आळंदीमध्ये दाखल होतात. या वारकऱ्यांचं श्रद्धास्थान असलेल्या इंद्रायणी नदीच्या प्रदूषणामुळे चिंता व्यक्त केली जात आहे. इंद्रायणी नदीतील प्रदूषणामुळे वारकरी आणि नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. वारकऱ्यांच्या आणि आळंदीकरांच्या आरोग्याशी खेळ- खेळला जातो की काय? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. इंद्रायणी नदीच्या प्रदूषणावर प्रशासन देखील ठोस पावलं उचलत नसल्याचं बघायला मिळत आहे. इंद्रायणी नदी प्रदूषण मुक्त व्हावी यासाठी प्रशासनाने योग्य ते निर्णय घेणे गरजेचे आहेत.त्यांनी यावेळी केले. अशातच पुन्हा एकदा इंद्रायणी नदी फेसाळली आहे. नदीमध्ये रसायनयुक्त पाणी सोडलं गेल्याने हे प्रदूषण होत असल्याचा आरोप आळंदीकरांनी केला आहे. गेल्या काही दिवसांमध्ये इंद्रायणी नदीमध्ये वारंवार रसयानुक्त फेस येत असल्याचं दिसून येत आहेत. यासंबंधी प्रशासन देखील गंभीर नसल्याचे चित्र अधोरेखित होत आहे. येत्या नऊ डिसेंबरला आळंदीमध्ये कार्तिकी वारी सोहळा होणार आहे. तर अकरा डिसेंबरला ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा पार पडणार आहे

### प्रशासन गंभीर नसल्याचे चित्र

» लाखो वारकऱ्यांचं श्रद्धास्थान असलेल्या आळंदीत इंद्रायणी नदी पुन्हा एकदा जलप्रदूषणाच्या विळख्यात अडकली आहे. संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. अशातच पुन्हा एकदा इंद्रायणी नदी फेसाळली आहे. नदीमध्ये रसायनयुक्त पाणी सोडलं गेल्याने हे प्रदूषण होत असल्याचा आरोप आळंदीकरांनी केला आहे. गेल्या काही दिवसांमध्ये इंद्रायणी नदीमध्ये वारंवार रसयानुक्त फेस येत असल्याचं दिसून येत आहेत. यासंबंधी प्रशासन देखील गंभीर नसल्याचे चित्र अधोरेखित होत आहे.

# इंद्रायणी रिव्हर सायक्लॉथॉन' टीमचा विश्वविक्रम!

## 'लॉंगेस्ट लाईन ऑफ बायसिकल्स स्टॅटिक्स'च्या विक्रमाची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद; पिंपरी-चिंचवडच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

### आज होणार ऐतिहासिक रॅली!

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पर्यावरण संवर्धनासाठी काम करणाऱ्या 'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन' टीमच्या पुढाकारामुळे पिंपरी-चिंचवड शहराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. या टीमने जर्मनीचा विक्रम मोडीत काढत 'लॉंगेस्ट लाईन ऑफ बायसिकल्स स्टॅटिक्स'चा विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे. त्याची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. त्यामुळे उद्या, रविवारी दि. ३ डिसेंबर रोजी होणाऱ्या ऐतिहासिक रॅलीला सुमारे ३० हजार सायकलपटू सहभागी होतील, असा दावा आयोजकांनी केला आहे.**




इंद्रायणी नदी स्वच्छता आणि संवर्धनासाठी अविरत श्रमदान, सायकल मित्र, महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन, पिंपरी-चिंचवड महापालिका, पिंपरी-चिंचवड पोलीस आणि परिसरातील पर्यावरण प्रेमी संस्था, संघटनांच्या पुढाकाराने प्रतिवर्षी 'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन' आयोजित केली जाते. त्या पार्श्वभूमीवर शनिवारी 'रिव्हर सायक्लोथॉन' टीमने विश्वविक्रम प्रस्थापित करण्याचा संकल्प केला होता. यावेळी आमदार महेश लांडगे, अविरत श्रमदानचे डॉ. निलेश लोंढे यांच्यासह गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

२०१५ मध्ये जर्मनीमध्ये 'लॉंगेस्ट लाईन ऑफ बायसिकल्स स्टॅटिक्स'चा विश्वविक्रम प्रस्थापित करण्यात आला होता. त्यानंतर हा विक्रम भारताच्या आणि पर्यायाने पिंपरी-चिंचवडच्या नावावर कोरण्यात आला आहे. भोसरी येथील गावजत्रा मैदानावर हा विक्रम स्थापित करण्यात आला.

याबाबत भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांनी सोशल मीडियावर माहिती दिली आहे.

> 'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन' च्या टीमसाठी आजचा दिवस सुवर्णाक्षरांनी कोरला जाईल. गेले दोन महिने आम्ही यासाठी प्रयत्न करीत आहोत. 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये नोंद झाल्याचे विशेष समाधान आहे. आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून नदी स्वच्छता आणि संवर्धनाचा संदेश देण्यासाठी उद्या. दि. ३ डिसेंबर रोजी सकाळी गावजत्रा मैदान, भोसरी येथून ऐतिहासिक सायकल रॅली निघणार आहे. ५ किमी, १० किमी आणि २५ किमी अशा तीन प्रकारांत रॅली होईल. विजेत्यांना मेडल आणि भेटवस्तू देण्यात येणार आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने या रॅलीमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन करतो.
>
> – **डॉ. निलेश लोंढे,** रिव्हर सायक्लोथॉन टीम.

---

# मोशीतील रिव्हर सोसायटीसमोरील क्रीडांगणाचा निर्णय होईपर्यंत साखळी उपोषण!

## विरोधत निर्णय घेतल्यास अमरण उपोषण:रूपाली आल्हाट

। पिंपरी-चिंचवड ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**रिसरातील रिव्हर सोसायटीसमोरील क्रीडांगणाबाबत सोमवारी साडेदहा वाजता बैठक घेऊन तोडगा काढण्याबाबत आयुक्तांनी प्राथमिक पत्र दिले आहे. त्यामुळे अमरण उपोषणाऐवजी साखळी उपोषण सुरु आहे. सोमवारी(दि.४) हॉर्स रायडिंगचा निर्णय मागे न घेतल्यास पुन्हा अमरण उपोषण करू असा इशारा शिवसेनेच्या रूपाली आल्हाट यांनी दिला आहे.**



मागील पाच दिवसांपासून रिव्हर सोसायटीसोमर उपोषण सुरु आहे. यासोबतच स्वाक्षरी मोहीम सुरु आहे. घोडेस्वारीसाठी दुसरे मैदान निवडा हे मैदान आम्हाला खेळायला, धावायला ठेवा असे म्हणत चिमुकले स्वाक्षरी करत आहेत., याबाबत बोलताना रूपाली आल्हाट म्हणाल्या, हे क्रीडांगण घोडेस्वारीसाठी नको तर अबालवृध्दांना चालायला, चिमुकल्यांना खेळायला, बागडायला ठेवा.

सध्याच्या मुलांना मैदानी खेळ महत्वाचे म्हणतो, मग मैदानच नाही तर खेळ कसले. यासाठी प्रशासनासोबचत पत्रव्यवहार केला होता. त्यांनी हॉर्सरायडींग थांबवण्याची भूमिका न घेतल्याने उपोषण सुरु केले. सोमवारी सकारात्मक बैठक न झाल्यास पुन्हा अमरण उपोषणाचा लढा सुरुच ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले.



## पिंपरीत पॅराशूट कंपनीच्या नावाने बनावट तेलाची विक्री, दुकानदारावर गुन्हा दाखल!

। पिंपरी-चिंचवड ।महाईन्यूज । प्रतिनिधी।


पॅराशूट कंपनीच्या नावाने बनावट तेलाची विक्री करणाऱ्या दुकानदारावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिंपरी येथील मेन बाजारात असलेल्या महालक्ष्मी ट्रेडर्स या दुकानात ही कारवाई करण्यात आली. छीवाराम लादूराम चौधरी असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या दुकानदाराचे नाव आहे. याप्रकरणी निखील दिनकर पाटील यांनी पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी चौधरी याने त्याच्या दुकानात पॅराशूट कंपनीच्या नावाने बनावट तेलाची विक्री केली. याबाबत माहिती मिळाल्यानंतर दुकानावर कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये पोलिसांनी १४ हजार ९५० रुपये किमतीच्या २३८ बनावट तेलाच्या बाटल्या जप्त केल्या आहेत. पिंपरी पोलीस तपास करीत आहेत.




# ‘स्वायत्त’ संस्थांचीही भिस्त सत्ताधाऱ्यांवरच!

**चीनमधील अर्थकारणाची जबाबदारी ज्या ‘केंद्रीय वित्तीय आयोग’ आणि ‘केंद्रीय आर्थिक कार्य समिती’ (पूर्वीची ‘राष्ट्रीय आर्थिक कार्य परिषद’)अशा दोन यंत्रणांवर आहे, त्यांवर नव्या नेमणुका करण्यात आल्यानंतर बराच काळ केंद्रीय आर्थिक कार्य परिषदेची बैठकच झाली नव्हती, ती अखेर महिन्याभरापूर्वी – ३० व ३१ ऑक्टोबर रोजी बीजिंगमध्ये पार पडली. ही समिती म्हणजे चीनची सर्वोच्च आर्थिक संस्था!**

साहजिकच, पुढील पाच वर्षांसाठी आर्थिक धोरण या समितीच्या परिषदेत ठरते. चीनच्या आर्थिक वाढीत झालेली घसरण, त्यातून सावरण्याच्या शक्यताही धूसरच, अशा पार्श्वभूमीवर चिनी अर्थशास्त्रज्ञ, प्रांतीय सरकारी अधिकारी आणि इतरही अनेकांचे डोळे या परिषदेकडे लागले होते, ते पाच वर्षातून एकदा होणारी ही महत्त्वपूर्ण केंद्रीय परिषद अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी आणि पुनरुज्जीवन करण्यासाठी पावले उचलेल, म्हणून! त्यांना अपेक्षा होती की उपायांमध्ये चिनी बांधकाम उद्योगासारखी (रिअल इस्टेट) जी क्षेत्रे सपाटून मार खाताहेत, त्यांना सावरण्यासाठी मोठ्या रकमेचा समावेश असेल. परिषदेने या दृष्टीने काही पावले उचलली खरी पण मोठा भर दिला तो ‘सुरक्षा’ आणि ‘विकास’ यांवरच. चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांनी कम्युनिस्ट पक्षाच्या विसाव्या महापरिषदेत स्वत:च्या तिसऱ्या



कारकीर्दीतील धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे म्हणून याच ‘सुरक्षा आणि विकास’वर भर दिला होता- त्यांचीच री आर्थिक समितीने ओढल्याचे दिसले.

या आर्थिक परिषदेत ‘महत्त्वाची’ भाषणे झाली, ती चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग आणि चिनी पंतप्रधान ली कियांग यांचीच. परिषदेला कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिटब्युरो स्थायी समितीचे सर्व सदस्य, प्रांतीय सरकारांचे प्रमुख तसेच प्रांतोप्रातीच्या आर्थिक खात्यांचे प्रमुख आणि इतर राजकीय पदाधिकारी उपस्थित होते.‘शिन्हुआ’ या चीनच्या अधिकृत वृत्तसंस्थेने या परिषदेच्या बातम्या दिल्या त्यांचे मथळे ‘वित्त ही राष्ट्रीय अर्थव्यवस्थेची जीवनरेखा आहे’ किंवा ‘अर्थव्यवस्था हा देशाच्या स्पर्धात्मकतेचा एक महत्त्वाचा भाग आहे’ यावर भर देणारे होते. या परिषदेने आर्थिक व्यवस्थेत सुधारणा करणे अनिवार्य असल्याचे ठरवले आहे, हे सांगताना चिनी वृत्तसंस्थेचे शब्द ‘सरकारने चिनी वैशिष्ट्यांसह आर्थिक विकासावर लक्ष केंद्रित करावे आणि चिनी शैलीतील आधुनिकीकरणासह मजबूत देशाच्या निर्मितीसाठी आणि सर्वांगीण मार्गाने देशाच्या राष्ट्रीय पुनरुत्थानासाठी भक्कम पाठिंबा द्यावा, असे आवाहन परिषदेने केले आहे.’ असे होते! चिनी अर्थव्यवस्थेचे नेतृत्व चिनी कम्युनिस्ट पक्षच (सीसीपी) करतो आहे, यावर या परिषदेत भर देण्यात आला. ‘सीसीपी’ने ‘मार्क्सवादी आर्थिक सिद्धान्तांना समकालीन चीनच्या ठोस वास्तवाशी आणि पारंपारिक चिनी संस्कृतीच्या उत्कृष्टतेशी जोडले आहे’ अशी भलामणही करण्यात आली. ‘आर्थिक क्षेत्राने‘सीसीपी’च्या केंद्रीय समितीचे केंद्रीभूत आणि एकात्म नेतृत्व मान्य करताना लोक-केंद्री मूल्यांची जपणूक करणे आवश्यक आहे’हेही या बैठकीत स्पष्ट करण्यात आले आणि ‘आर्थिक क्षेत्रात उत्तम काम करण्यासाठी आपण पक्षाच्या एकंदर नेतृत्वाचे पालन केले पाहिजे आणि पक्षाला बळकट केले पाहिजे, नवीन युगात क्षी जिनपिंग यांचा ‘चिनी वैशिष्ट्यांसह समाजवादा’चा विचार मार्गदर्शक म्हणून स्वीकारला पाहिजे, विसाव्या सीपीसी महापरिषदेची भावना पूर्णपणे अंमलात आणली पाहिजे... (त्यासाठी) विज्ञान आणि तंत्रज्ञान वित्त, हरित वित्त, सर्वसमावेशक वित्त, पेन्शन वित्त आणि डिजिटल वित्त यांवर भर राहायला हवा’ असा या बैठकीचा रोख होता. हे झाले अधिकृत वृत्तसंस्थांच्या बातम्यांमधले म्हणणे. प्रत्यक्षात केंद्रीय आर्थिक कार्य समितीच्या दोन दिवसीय बैठकीनंतरचा ठराव अवघ्या ११४ शब्दांचा होता. पीपल्स बँक ऑफ चायना आणि चायना सिक्युरिटीज रेग्युलेटरी कमिशन सारख्या सरकारी संस्थांवर देखरेख करण्यासाठी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील केंद्रीय वित्तीय आयोगाची स्थापना करणे आणि चीनच्या ६१ ट्रिलियन डॉलर इतक्या आकारमानाच्या वित्तीय क्षेत्रावर कम्युनिस्ट पक्षाचे नियंत्रण मजबूत करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या ‘कम्युनिस्ट पक्षाच्या केंद्रीय आर्थिक आणि आर्थिक व्यवहार आयोगा’चे कार्यालय संचालक म्हणून उप-पंतप्रधान हे लीफेंग यांची नियुक्ती करणे, हे त्या ठरावाचे प्रमुख साध्य.

## संपादकीय »

### शतायुषी शहाणा!

***महाभारतासारखे महाकाव्य लिहिणारे ‘व्यास’ व्हायचे आणि त्याच वेळी त्याच्या कथनासाठी ‘संजया’ची भूमिकाही वठवायची!***

महाभारतासारखे महाकाव्य लिहिणारे ‘व्यास’ व्हायचे आणि त्याच वेळी त्याच्या कथनासाठी ‘संजया’ची भूमिकाही वठवायची! हे आव्हान एकाच वेळी पेलण्याची प्रतिभा आणि त्यास आवश्यक प्रज्ञा फार कमी जणांस लाभलेली असते. हेन्री किसिंजर हे अशा निवडक प्रतिभावानांतील एक. अमेरिका या जगातील एकमेव महासत्तेचे एक नव्हे, दोन नव्हे, तीनही नव्हे तर तब्बल १२ अध्यक्ष, आधुनिक चीनचे संस्थापक माओ झेडाँग, डेंग शियाओिपग ते आताचे क्षी जिनिपग यांचे अप्रत्यक्ष जागतिक दूत, साम्यवादाच्या आणि शीतयुद्धाच्या तप्त काळातील एक क्रियाशील घटक आणि या साम्यवादी सत्तेची अखेर, अमेरिकी अर्थकारणातील सक्रिय भिडू अशा अनेक भूमिका किसिंजर यांनी वठवल्या आणि यातील बऱ्याचशा भूमिकांची संहिताही त्यांनी लिहिली. पण त्याच वेळी किसिंजर हे या सर्व महाभारताचे उत्कृष्ट कथनकार होते.

**रिझर्व्ह बँकेसह अनेक प्रतिष्ठित विश्लेषकांनी व्यक्त केलेल्या पूर्वानुमानापेक्षा कितीतरी सरस दराने वाढ साधत आहे, असा सुखद दिलासा गुरुवारी सायंकाळी जाहीर झालेल्या आकडेवारीने दिला. आर्थिक वर्षाच्या जुलै ते सप्टेंबर या दुसऱ्या तिमाहीत सकल राष्ट्रीय उत्पादनाचाम्हणजे पर्यायाने भारताच्या अर्थव्यवस्थेचा वाढदर ७.६ टक्के असा नोंदवला गेल्याची आकडेवारी राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने जाहीर केली.**

# जीडीपी’चा दिलासा अन् चिंतेची लकेर

रिझर्व्ह बँकेचा या संबंधाने अंदाज ६.५ टक्क्यांचा होता, तर इतर तज्ज्ञांच्या मते हा दर जास्तीत जास्त ७.२ टक्क्यांपर्यंत जाऊ शकेल असेच एकंदर कयास होते. त्या सर्व अंदाजांना मागे सोडून अर्थ-आकडेवारीतील ही तिमाहीतील आश्चर्यकारक झेप पाहता, आता अनेक अर्थतज्ज्ञ आणि देशी-विदेशी दलाली पेढ्यांनी संपूर्ण वर्षासाठी ७ टक्क्यांच्या जवळ नेणारे वाढीव अनुमान लगोलग व्यक्त केले आहेत. विशेषत: कायमच मरतुकडय़ा राहत आलेल्या शेतीला वगळता, अन्य क्षेत्रांमध्ये दिसून आलेली ही वाढ असल्याने उर्वरित सहामाहीतील कामगिरीच्या उजळतेस ती उपकारक नक्कीच ठरेल. त्यामुळे ताज्या आकडेवारीबाबत हर्षोल्हास व्यक्त करणाऱ्या प्रतिक्रिया निर्थक निश्चितच नाहीत. तथापि थोडे खोलात जाऊन, क्षेत्रवार आणि घटकांनुरूप ताज्या आकडेवारीची फोड करून पाहणेदेखील तितकेच आवश्यक आहे.

शेती क्षेत्राच्या भिकार कामगिरीत



प्रतिबिब उमटले आहे. पहिल्या तिमाहीत ३.५ टक्क्यांची या क्षेत्राने नोंदवलेली वाढ दुसऱ्या तिमाहीत निम्म्याहून कमी अवघ्या १.२ टक्क्यांपर्यंत मर्यादित राहिली. करोनाकाळात टाळेबंदीने देशाची अर्थचाके एकाच जागी थिजली असताना, अर्थव्यवस्थेत गतिमानता दाखवणारा हाच एक घटक होता, हे लक्षात घ्यायला हवे. शेतीला अपायकारक ठरलेला तुटीचा पाऊस हा निर्मिती क्षेत्र आणि बांधकाम यांसारख्या घटकांच्या मात्र पथ्यावर पडला आहे. सरलेल्या तिमाहीत या दोहोंमध्ये अनुक्रमे १३.५ टक्के आणि १३.३ टक्क्यांची दमदार वाढ दिसून आली आहे. विशेषत: गृहनिर्माण क्षेत्रासाठी गेले संपूर्ण वर्ष खूपच चांगले गेले आहे आणि यंदा जुलै ते सप्टेंबर अशा ऐन पावसाळ्य़ात फारसा व्यत्यय न येता या क्षेत्रात कामे सुरू राहिल्याचे हे आकडे द्योतक आहेत. चिंतेची लकेर निर्माण करणाऱ्या आकडेवारीचा एक घटक हा की, खासगी अंतिम उपभोग खर्च (पीएफसीई) हा सरलेल्या तिमाहीत अवघ्या ३.१ टक्क्यांच्या दराने वाढला आहे. अर्थात निवासी कुटुंबे आणि कुटुंबांना सेवा देणाऱ्या संस्था यांच्याकडून वस्तू आणि सेवांच्या अंतिम उपभोगावर झालेला खर्च हा एप्रिल-जून तिमाहीतील खर्चाच्या निम्म्याने बरोबरी करणाराही नाही. घरभाडे, वीज, पाणीपट्टी, शिक्षण, आरोग्य या मूलभूत गोष्टींसह, कपडेलत्ते, करमणूक, प्रवास, खानपान या खर्चाचा यात समावेश होतो. ताज्या आकडेवारीचा अन्वयार्थ लावायचा तर, संप्रूण गणेशोत्सव आणि पुढे सणांचा हंगाम तोंडावर असताना जुलै-सप्टेंबर तिमाहीत ग्राहक बाजारपेठा फुललेल्या दिसल्याचे जे चित्र दिसून आले ते फसवे म्हणावे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राजेश टोपे यांच्या कारवर हल्ला!

## » लोणीकर यांच्या कार्यकर्त्यांकडून ही दगडफेक?

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्या कारवर आज (२ डिसेंबर) अज्ञातांनी दगडफेक केली. भाजपा नेते बबनराव लोणीकर यांच्या कार्यकर्त्यांकडून ही दगडफेक झाल्याचं म्हटलं जातंय. याबाबत बबनराव लोणीकर यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. तसंच राजेश टोपेंनी आमच्या अंगावर गाडी नेण्याचा प्रयत्न केला, असंही ते म्हणाले. माध्यमांना दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते.**




बबनराव लोणीकर म्हणाले की, जालना जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणूक सुरू होती. संचालक निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी आमची चर्चा सुरू होती. शिंदे गटाचे नेते अर्जुन खोतकर, अजित पवार गटाचे अरविंद चव्हाण, राष्ट्रवादीचे राजेश टोपे तेथे उपस्थित होते. पाच तास चर्चा झाली. चर्चा बिनविरोध झाली. पुढे अध्यक्ष आणि उपाध्यक्षाच्या निवडणुकीसाठी माझ्या बंगल्यावर राजेश टोपे पाच – सहा तास बसले. भाजपा, अजित पवार गट आणि एकनाथ शिंदे गट या तीन पक्षांत ही बैठक झाली. परतूर, मंठा या दोन तालुक्याला या बँकेचं उपाध्यक्षपद द्यायचं, असं ठरलं होतं. परंतु, ऐनवेळेला राजेश टोपेंनी पलटी मारली, विश्वासघात केला. त्यामुळे कार्यकर्त्यांसोबत बाचाबाची झाली. आमच्या भाजपा कार्यकर्त्यांची तक्रार आहे की, त्यांनी आमच्या अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न केला. म्हणून या गोष्टी घडल्या", असा आरोप बबनराव लोणीकर यांनी केला आहे. "आता जिल्हा शांत राहिला पाहिजे. त्यांच्या गाडीच्या काच्या फुटल्या असतील तर दुरुस्त करून देऊ. परंतु, जिल्ह्यांत भाजपा आणि राष्ट्रवादीत संघर्ष निर्माण करायचा असेल तर आम्ही केव्हाही रस्त्यावरची लढाई लढायला तयार आहे" , असा इशाराही त्यांनी दिला. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्या कारवर अज्ञातांनी दगडफेक केली आहे. जालना जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या आवारात कार उभी असताना अज्ञातांकडून दगडफेक करण्यात आली. या हल्ल्यात कारचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे.

### अज्ञात हल्लेखोरांकडून हल्ला

» राजेश टोपे यांच्या गाडीवर हल्ला कोणी केला हे समजू शकलं नाही, त्यामुळे यातील आरोपीचं अद्याप समोर आलेलं नाही. या घटनेत त्यांच्या गाडीच्या समोरची काच फुटली आहे. गाडीजवळ एक लाकडी दांडा आणि ऑइलची बाटली देखील सापडलेली आहे. पोलीस घटनास्थळी दाखल झालेली असून मराठवाड्यात गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी जालना जिल्हा सध्या चर्चेत आहे. राजेश टोपे हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर राजेश टोपे यांनी शरद पवार यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतलेला आहे. जालन्यात सध्या जिल्हा बँक निवडणूक, आरक्षण आंदोलनामुळे वातावरण संवेदनशील झालेलं आहे. अशा पार्श्वभूमीवर राजेश टोपे यांच्या गाडीची तोडफोड नेमकी कुणी केली आणि का? केली याचं कारण अद्याप समोर आलेलं नाही. राजेश टोपे यांच्याकडून देखील यासंदर्भातील भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नाही, अशी माहिती आहे. दरम्यान, घटनास्थळी अपर पोलीस अधीक्षक उपविभागीय पोलिस अधिकारी सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दाखल झाले.

# राज ठाकरेंची शिंदे-फडणवीस-पवार सरकारवर टीका

## » वैद्यांनी सुरुवात केलेला वडापाव लंडनमधली लोक खात आहेत

। हिंगोली ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबईतील गोरेगाव येथे आजपासून वडापाव महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी वडापाव महोत्सवाला भेट दिली. यावेळी त्यांनी उपस्थित जनतेला संबोधून वडापावबाबतच्या त्यांच्या बालपणीच्या आठवणीही सांगितल्या. तसंच, आजच्या राजकीय परिस्थितीवरही त्यांनी मिश्किल भाषण केलं.**



राज ठाकरे म्हणाले, अशोक वैद्य यांनी वडापाव ही संकल्पना मांडली. ही अशी माणसं आहेत ज्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार दिला पाहिजे. हा वडापाव कुठे कुठे पोहोचला आहे. दहा वर्षांपूर्वी दोन मराठी मुलं माझ्याकडे आले आणि म्हणाले की, आज सकाळी बाळासाहेबांना भेटलो, तुम्हाला भेटायची इच्छा होती. तुम्ही आम्हाला भेटलात. आज संध्याकाळच्या फ्लाईटने आम्ही लंडनला झाला. लंडनला गेल्यावर काय करणार असं विचारलं. तर ते म्हणाले की लंडनला जाऊन आम्ही वडापाव विकणार आहोत. मी तिथे नंतर एकेदिवशी जाऊन आलो. गोऱ्या लोकांची वडापाव खायला प्रचंड गर्दी होती. तिथं तिखट मानवत नाही. पण अशोक वैद्यांनी सुरुवात केलेला एक वडापाव लंडनमधली लोक खात आहेत. "सचिन तेंडुलकरांचे गुरू आचरेकरसर त्याला शिकवत असताना स्टम्पवर एक रुपया ठेवायचे. आणि तो एक रुपया ठेवल्यानंतर सचिनला सांगायचे की हा जर इथंच राहिला तर संध्याकाळचा वडापाव तुझा. सचिन खेळत बसायचा, पण स्टम्पला बॉल लागू द्यायचा नाही त्या वडापावसाठी. मला एक उद्योगपतीही माहितेयत, ते बॉलरुम घेतात आणि फुटबॉलची फायनल तिथे घेतात. सगळे उद्योगपती तिथे असतात. मेन्यु काय असतो तर वडापाव आणि शॅम्पेन. हे गेले अनेक वर्षे चालत आहे", असंही राज ठाकरे म्हणाले. मी आजपर्यंत वाईट वडापाव खालला नाही. माझं बालपण शिवाजी पार्कात गेल्याने किर्ती कॉलेजजवळचा वडापाव, शिवाजी पार्कमधील वडापाव, जिमखाना येथील वडापाव खालला आहे. येथील वडापाव खात खात पुढच्या पिढ्या उभ्या राहिल्या. अशोक वैद्यांनी किती पिढ्या घडवल्या आणि किती गाड्या उभ्या केल्या", अशीही आठवण राज ठाकरेंनी सांगितली. आज या भाषणाचा विषय नाही. पण गेल्या वर्षभरापासून वडापाव पाहिला की मला आजच्या राज्य सरकारची आठवण होते. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यामधला वडा अजित पवार आहेत की अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्या मधला वडा एकनाथ शिंदे आहेत, की वाईस वर्सा आहे", असं म्हणत राज ठाकरेंनी राज्यातील सद्यस्थितीवर भाष्य केलं. दरम्यान, राज ठाकरेंनी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आज सकाळी भेट घेतली होती. मराठी पाट्यांच्या मुद्द्यांवरून त्यांनी मुख्यमंत्र्याची भेट घेऊन चर्चा केली.मुंबईतील गोरेगाव येथे आजपासून वडापाव महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी वडापाव महोत्सवाला भेट दिली.

### सगळे उद्योगपती तिथे असतात

» "सचिन तेंडुलकरांचे गुरू आचरेकरसर त्याला शिकवत असताना स्टम्पवर एक रुपया ठेवायचे. आणि तो एक रुपया ठेवल्यानंतर सचिनला सांगायचे की हा जर इथंच राहिला तर संध्याकाळचा वडापाव तुझा. सचिन खेळत बसायचा, पण स्टम्पला बॉल लागू द्यायचा नाही त्या वडापावसाठी. मला एक उद्योगपतीही माहितेयत, ते बॉलरुम घेतात आणि फुटबॉलची फायनल तिथे घेतात. सगळे उद्योगपती तिथे असतात. मेन्यु काय असतो तर वडापाव आणि शॅम्पेन. हे गेले अनेक वर्षे चालत आहे", असंही राज ठाकरे म्हणाले.

# सोमवारपासून संसदेचे हिवाळी अधिवेशन!

## अधिवेशनात सर्वांच्या नजरा असणार या विधेयकांवर

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सोमवार 4 डिसेंबरपासून संसदेचे हिवाळी अधिवेशन (PARLIAMENT WINTER SESSION) सुरू होत आहे. या कालावधीत केंद्र सरकार (CENTRAL GOVERNMENT) सात नवीन आणि 11 प्रलंबित मोठी विधेयके सादर करण्यात येतील. या सर्व विधेयकांवर चर्चा केली जाईल. हिवाळी अधिवेशन 4 डिसेंबरपासून सुरू होत असून ते 22 डिसेंबरपर्यंत चालणार आहे. मात्र, यादरम्यान काही विधेयके अशी आहेत ज्यांची सर्वाधिक चर्चा होत आहे.**



भारतीय न्यायिक संहिता विधेयक 2023, भारतीय नागरी संरक्षण संहिता विधेयक 2023 आणि भारतीय पुरावा विधेयक 2023 हे संसदेत सादर होणाऱ्या प्रमुख विधेयकांपैकी आहेत. त्याचवेळी हिवाळी अधिवेशनापूर्वी सरकारने शनिवारी (2 डिसेंबर) सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. यामध्ये राजकीय पक्षांच्या नेत्यांनी हिवाळी अधिवेशनाच्या अजेंड्यावर चर्चा केली. संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी ही बैठक बोलावली होती. या बैठकीत काँग्रेस, भाजपसह सर्वच पक्षांच्या नेत्यांचा समावेश करण्यात आला होता. बिझनेस स्टँडर्डच्या अहवालानुसार, 'सेंट्रल गुड्स अँड सर्व्हिसेस टॅक्स (द्वितीय दुरुस्ती) विधेयक' हे सरकारने सूचीबद्ध केलेल्या सात नवीन विधेयकांमध्ये समाविष्ट केले आहे. याद्वारे जीएसटी कौन्सिलच्या शिफारशी लागू केल्या जातील. तेलंगणात केंद्रीय आदिवासी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी विधेयक आणले जाईल. जम्मू-काश्मीर आणि पुद्दुचेरीच्या विधानसभांमध्ये महिला कोटा निश्चित करण्यासाठी सरकार दोन विधेयके आणणार आहे. जवळपास 100 वर्षे जुना बॉयलर कायदा, 1923 पुन्हा लागू करण्यासाठी सरकारने बॉयलर विधेयक, 2023 सूचीबद्ध केले आहे. या माध्यमातून लोकांच्या जीविताचे रक्षण होणार आहे. तसेच 'तात्पुरते कर संकलन विधेयक, 1931' पुन्हा लागू करण्यासाठी 'अस्थायी कर संकलन विधेयक, 2023' सूचीबद्ध केले आहे. ब्रॉडकास्टिंग सर्व्हिसेस रेग्युलेशन बिल, 2023 सूचीबद्ध केले गेले नाही कारण त्यावर शिफारसी मागवल्या गेल्या आहेत. त्याच वेळी, विरोधक भारतीय न्याय संहिता विधेयक 2023, भारतीय नागरी संरक्षण संहिता विधेयक 2023 आणि भारतीय पुरावा विधेयक 2023 च्या हिंदी नावांवर आक्षेप नोंदवण्याची शक्यता आहे. गेल्या आठवड्यात, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहून ही विधेयके त्वरित मंजूर करण्यात घाई करू नये, अशी विनंती केली होती.

### लोकांच्या जीविताचे रक्षण होणार

संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी ही बैठक बोलावली होती. या बैठकीत काँग्रेस, भाजपसह सर्वच पक्षांच्या नेत्यांचा समावेश करण्यात आला होता. बिझनेस स्टँडर्डच्या अहवालानुसार, 'सेंट्रल गुड्स अँड सर्व्हिसेस टॅक्स (द्वितीय दुरुस्ती) विधेयक' हे सरकारने सूचीबद्ध केलेल्या सात नवीन विधेयकांमध्ये समाविष्ट केले आहे. याद्वारे जीएसटी कौन्सिलच्या शिफारशी लागू केल्या जातील. तेलंगणात केंद्रीय आदिवासी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी विधेयक आणले जाईल. जम्मू-काश्मीर आणि पुद्दुचेरीच्या विधानसभांमध्ये महिला कोटा निश्चित करण्यासाठी सरकार दोन विधेयके आणणार आहे. जवळपास 100 वर्षे जुना बॉयलर कायदा, 1923 पुन्हा लागू करण्यासाठी सरकारने बॉयलर विधेयक, 2023 सूचीबद्ध केले आहे. या माध्यमातून लोकांच्या जीविताचे रक्षण होणार आहे. तसेच 'तात्पुरते कर संकलन विधेयक, 1931' पुन्हा लागू करण्यासाठी 'अस्थायी कर संकलन विधेयक, 2023' सूचीबद्ध केले आहे.

# डेस्टिनेशन वेडिंगच्या नावावर करोडोंचा खर्च

## सध्या लोकांमध्ये डेस्टिनेशन वेडिंगची क्रेझ

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशात लग्नसराईचा हंगाम सुरु झाला आहे. यावर्षी देशभरात 38 लाख विवाह होणार आहेत. अशा परिस्थितीत प्रत्येकजण आपल्या भावी जोडीदाराशी परदेशात किंवा सातासमुद्रापलीकडील एखाद्या सुंदर ठिकाणी लग्न करण्याचे स्वप्न पाहतो. जेणेकरून तो क्षण आयुष्यभर संस्मरणीय बनवू शकेल. सध्या लोकांमध्ये डेस्टिनेशन वेडिंगची (क्रेझही वाढत आहे. काही लोक त्यांच्याच शहरात लग्न करत आहेत, तर काही शहराबाहेर जाऊन डेस्टिनेशन वेडिंग करत आहेत. या प्रकारच्या लग्नांना सामान्य लग्नापेक्षा जास्त खर्च येतो. यावेळी लोक डेस्टिनेशन वेडिंगच्या नावाखाली लग्नावर करोडो रुपये खर्च करत आहेत.**



डेस्टिनेशन वेडिंगचा ट्रेंड इतका वाढू लागला की पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही रेडिओवरील मन की बात कार्यक्रमात याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले की, सध्या काही कुटुंबांसाठी परदेशात जाऊन लग्न करण्यासाठी नवीन वातावरण तयार केले जात आहे. ते आवश्यक आहे का? असा सवाल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थित केला होता. विवाह उद्योगाशी संबंधित तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, लोकांमध्ये घरापासून दूर सुंदर ठिकाणी लग्न करण्याचा ट्रेंड वाढत आहे. वेडिंग प्लॅनर VENDINGSUTRA.COM चे सीईओ प्रदीप थियागराजन यांच्या मते, 10 टक्के उच्च नेट वर्थ व्यक्ती डेस्टिनेशन वेडिंगला प्राधान्य देत आहेत. परदेशात लग्न करणारे फार कमी लोक आहेत. बहुतेक विवाह राजस्थान, गोवा, महाबलीपुरम, केरळ आणि मुंबई आणि दिल्लीच्या आजूबाजूला वेडिंग हॉटस्पॉट मानल्या जाणाऱ्या ठिकाणी होत आहेत. त्याचवेळी, केवळ 10 टक्के लोक आहेत जे परदेशात जाऊन लग्न करतात. ऑनलाइन वेडिंग वेंडर डिरेक्टरीने 2021 आणि 2022 च्या अहवालात म्हटले आहे की, लग्नावरील खर्चात सरासरी 10 ते 15 लाख रुपयांची वाढ झाली आहे. यंदा सरासरी 18 लाखांच्या आसपास असणार आहे. अनम जुबेरच्या मते, यावर्षी देशातील टॉप डेस्टिनेशन डेहराडून, गोवा आणि जयपूर आहेत. डेस्टिनेशन वेडिंगवर लोक 20 लाखांपासून करोडो रुपये खर्च करत आहेत. परदेशात लग्नसमारंभ झाला तर खर्च करोडोंमध्ये होतो. कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (CAIT) चे सरचिटणीस प्रवीण खंडेलवाल यांच्या म्हणण्यानुसार, दरवर्षी परदेशात सुमारे 5000 विवाह होतात. ज्यावर सुमारे 50,000 कोटी रुपये खर्च झाल्याचा अंदाज आहे. यावर्षी देशात 38 लाख लग्ने होतील असा अंदाज आहे ज्यामध्ये 4.7 लाख कोटी रुपयांचा व्यवसाय होऊ शकतो. अशा परिस्थितीत डेस्टिनेशन वेडिंग भारतातच होत असेल तर लग्नाचा खर्च भारतातच केला जाईल. याचा फायदा देशाच्या व्यवसाय आणि अर्थव्यवस्थेला होईल. लोकांना तात्पुरता रोजगार मिळेल.

# नव्या वर्षात केंद्रीय कर्मचाऱ्यांना मोठी भेट!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

मोदी सरकार नव्या वर्षात केंद्रीय कर्मचाऱ्यांना मोठी भेट देण्याची शक्यता आहे. 2024 च्या सुरुवातीला केंद्र सरकार महागाई भत्ता आणि महागाई सवलत वाढवण्याचा मोठा निर्णय घेऊ शकतो. दरवर्षी मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात केंद्र सरकार 48 लाखांहून अधिक केंद्रीय कर्मचारी आणि 68 लाख पेन्शनधारकांना त्यांच्या महागाई भत्त्यात आणि जानेवारी ते जून या महिन्यांसाठी महागाई भत्ता वाढवून देते. केंद्र सरकारला जानेवारी ते जून 2024 या महिन्यांच्या महागाई भत्त्यातही वाढ करण्याची गरज आहे. पण 2024 मध्ये महागाई भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय मोदी सरकार मार्च महिन्यात नव्हे तर नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच घेऊ शकते. कारण पुढील वर्षी एप्रिल ते मे दरम्यान लोकसभा निवडणुका होणार आहेत. केंद्र सरकार आपल्या कर्मचाऱ्यांना नवीन वर्षाच्या निमित्ताने महागाई भत्त्यात वाढीची भेट देऊ शकते. केंद्र सरकार दरवर्षी जानेवारी आणि जुलैमध्ये वर्षातून दोनदा डीए वाढवते. AICPI डेटानुसार, सरकार सातव्या वेतन आयोगाअंतर्गत केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ करते. त्यामुळे कर्मचाऱ्यांचा डीए कधी तीन टक्के तर कधी चार टक्क्यांनी वाढतो. आता नव्या वर्षात महागाई भत्त्यात 4 टक्क्यांची वाढ होऊन महागाई भत्ता 50 टक्के होण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारनं (MODI GOVERNMENT) दिवाळीपूर्वीच (DIWALI 2023) केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या (CENTRAL EMPLOYEES) महागाई भत्त्यात (DA HIKE) 4 टक्के वाढ केली आहे. त्यामुळे सध्या महागाई भत्ता 46 टक्के आहे. सरकारकडून केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यासोबतच पेन्शनधारकांच्या महागाई सवलतीतही वाढ केली जाते.


# पुष्पा 2 च्या शुटींगला पुन्हा ब्रेक!

ल्लू अर्जुनच्या पुष्पा २ सिनेमाची उत्सुकता शिगेला आहे. पुष्पाचा पहिला भाग सुपरहिट झाला. त्यामुळे पुष्पा २ ची भारतातीलच नव्हे तर जगभरातील लोकांना उत्सुकता आहे. अशातच पुष्पा २ बद्दल एक मोठी अपडेट समोर येतेय. अल्लू अर्जुनच्या पुष्पा २ सिनेमाच्या शुटींगला पुन्हा एकदा मोठा ब्रेक लागलाय. काय झालंय नेमकं? जाणून घ्या. सध्या हैदराबाद मधील रामोजी फिल्मसिटीमध्ये अल्लू अर्जुनच्या पुष्पा 2: द राइजचे शूटींग सुरु आहे. परंतु या शुटींगचे शेड्युल थांबवण्यात आलंय. एका महत्वपूर्ण प्रसंगाचं शुटींग करताना अभिनेता पाठदुखीमुळे हैराण झालाय. हैदराबादमधील रामोजी फिल्म सिटीमध्ये वजनाने जड असलेल्या पोशाखात अल्लू ॲक्शन आणि डान्स सिक्वेन्स शूट करत होता. पण याच पोशाखामुळे अल्लूला पाठदुखीच्या समस्येला सामोरे जावे लागलेय. अल्लू अर्जुनला अचानक दुखापत झाल्याने डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात शूटिंग पुढे ढकलण्यात आले आहे. एका सूत्राने हिंदुस्तान टाईम्सला सांगितले की, "अल्लू अर्जुन एका गाण्याच्या आणि फाईट सीक्वेन्सच्या शूटिंगसाठी जटारा गेट-अपमध्ये होता. ही वेशभूषा जड होती. त्यामुळे शुटींग करताना त्याला पाठदुखीचा तीव्र त्रास होऊ लागला. अल्लू अर्जुनच्या तब्येतीवर आणखी परिणाम होण्याऐवजी ब्रेक घेण्याचा निर्णय घेण्यात आलाय." 'पुष्पा २' पुढच्या वर्षी 15 ऑगस्टला थिएटरमध्ये रिलिज होणार आहे. या सिनेमात अल्लूसोबत फहाद फासिल, रश्मिका मंदान्ना, सुनील, प्रकाश राज आणि जगपती बाबू हे स्टार्स दिसणार आहेत. पुष्पा चा पहिला भाग सुपरहिट झालेला. त्यामुळे पुष्पा २ सुद्धा सुपरडुपरहिट होईल अशी चाहत्यांना आशा आहे. गेल्या काही दिवसांपासून अल्लू अर्जुन त्याच्या आगामी सिनेमा 'पुष्पा 2' साठी चर्चेत आहे. या चित्रपटाचा पहिला भाग 'पुष्पा: द राइज'ने बॉक्स ऑफिसवर चांगलाच धुमाकूळ घातला होता. चित्रपटातील पुष्पाची शैली, चित्रपटातील गाणी आणि संवाद, सर्व काही सुपरहिट ठरलं. इतकच नाही तर 'पुष्पा'साठी अल्लूला यंदाचा सर्वोत्कृष्ट अभिनेत्याच्या श्रेणीतील राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार देखील मिळाला आहे. अशा परिस्थितीत आता निर्माते लवकरच 'पुष्पा 2' चित्रपट आणण्याच्या तयारीत आहेत. या चित्रपटाचे पोस्टर देखील रिलिज करण्यात आले आहे. दरम्यान, आता या चित्रपटाबाबत एक मोठी माहिती समोर आली आहे. पुष्पाचा पहिला भाग हिट झाल्यानंतर अल्लू अर्जुनने त्याची फी वाढवली असल्याच्या बातम्या चर्चेत होत्या. मात्र आता अल्लू अर्जुनने या चित्रपटासाठी किती फी घेतली आहे याबाबत एक अपडेट समोर आले आहे.

## दिनेश फडणीस व्हेंटिलेटरवर

सी.आय.डी. या लोकप्रिय मालिकेत फ्रेडरिक उर्फ 'फ्रेडी'ची भूमिका साकारणारा अभिनेता दिनेश फडणीसची प्रकृती खालावली असल्याची बातमी समोर येतेय. फ्रेडरिक' म्हणजेच दिनेश फडणीस यांना हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांचं वय ५७ वर्षांचं आहे. अचानक ही बातमी समोर आल्याने फ्रेडरिक यांच्या चाहत्यांना आणि सी.आय.डीच्या कलाकारांना जबर धक्का बसलाय. दिनेश फडणीस जीवन-मरणाशी झुंज देत आहेत. हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांना मुंबईतील तुंगा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनेश फडणीस व्हेंटिलेटरवर असून जीवन-मरणाशी झुंज देत आहेत. रिपोर्ट्सनुसार, सीआयडीचे संपूर्ण कलाकार आणि क्रूला काल रात्री त्यांच्या तब्येतीची माहिती मिळाली, त्यानंतर अनेकांनी रुग्णालयात जाऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. दिनेश फडणीस यांनी CID मध्ये 'फ्रेडरिक्स' उर्फ फ्रेडी या नावाने प्रचंड लोकप्रियता मिळवली आहे. दिनेशने 'सरफरोश', 'मेला' आदी चित्रपटांमध्येही काम केले आहे. त्यांनी 20 वर्षे टीव्ही शो सीआयडीमध्ये फ्रेडीची भूमिका साकारली होती.

## कंगना वळणार राजकारणाकडे?



गेल्या काही दिवसांपासून कंगना राणौत तिच्या चित्रपटामुळे चर्चेत आहे. तिचा नुकताच रिलिज झालेला तेजस सिनेमा बॉक्स ऑफिसवर आपटला. कंगना नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणामुळे लाईमलाईटमध्ये राहते. ती नेहमी सोशल मिडियावर काही ना काही पोस्ट शेयर करत असते. त्यातच आता कंगना राजकारणात येणार अशा चर्चा गेल्या बऱ्याच दिवसांपासून सुरु होत्या. कंगना रणौत हिने 2024 ची लोकसभा निवडणूक लढविण्याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. गेल्या काही दिवसांपासून अभिनेत्री राजकारणात प्रवेश करणार असल्याच्या बातम्या झाल्यानंतर कंगनाने या अफवा फेटाळल्या आहेत. अभिनेत्री कंगना राणौतने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टच्या कॅप्शनमध्ये तिने लिहिले आहे की, माझे नातेवाईक आणि मित्र मी हे पाठवत आहे. त्यांना वाटत आहे की हे हेडलाईन मी दिली आहे. परंतु ही हेडलाइन आणि बातमी माझ्याकडून देण्यात आलेली नाही. कंगना राणौत अनेक दिवसांपासून राजकीय मुद्द्यांवर आपले मत व्यक्त करताना दिसत आहे. कंगना रणौतने काही दिवसांपूर्वी एक पोस्ट शेअर केली होती, या पोस्टनंतर अभिनेत्री निवडणूक लढवणार असल्याच्या बातम्या येऊ लागल्या. मात्र आता कंगना राणौतच्या या पोस्टनंतर ती 2024 ची लोकसभा निवडणूक लढवणारी ही केवळ अफवा असल्याचे स्पष्ट झाले आहे. कंगनाच्या वर्क फ्रंटबद्दल बोलायचे झाले तर ती तेजस या चित्रपटात दिसली होती. कंगना रणौतने तमिळ कॉमेडी-हॉरर सिक्वेल चंद्रमुखी 2 मध्येही काम केले . आता ती 'इमर्जन्सी' या चित्रपटात दिसणार आहे. प्रेक्षकही या चित्रपटाची आतुरतेने प्रतिक्षा करत आहेत. गेल्या काही दिवसांपासून कंगना राणौत तिच्या चित्रपटामुळे चर्चेत आहे. तिचा नुकताच रिलिज झालेला तेजस सिनेमा बॉक्स ऑफिसवर आपटला. कंगना नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणामुळे लाईमलाईटमध्ये राहते. ती नेहमी सोशल मिडियावर काही ना काही पोस्ट शेयर करत असते. त्यातच आता कंगना राजकारणात येणार अशा चर्चा गेल्या बऱ्याच दिवसांपासून सुरु होत्या.

## माझ्या 4 बायकांना मी 'डंकी' बघू देणार नाही

शाहरुख खान सध्या त्याच्या आगामी डंकी सिनेमामुळे चर्चेत आहे. शाहरुखने आजवर अनेक सिनेमांमधून लोकांच्या मनावर राज्य केलं. शाहरुखचा आगामी डंकी सिनेमा काहीच दिवसांमध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. शाहरुखने नुकतंच त्याच्या फॅन्ससोबत #ASKSRK हे सेशन केलंय. त्यावेळी एका चाहत्याने शाहरुखला भन्नाट प्रश्न विचारला. त्यावेळी शाहरुखने त्या चाहत्याला दिलेलं उत्तर चांगलंच चर्चेत आहे. शाहरुख खानने नुकतंच X वर फॅन्ससोबत प्रश्न - उत्तरांचं #ASKSRK सेशन केलं. एका फॅनने शाहरुखला सांगितलं, माझ्या ४ बायका, २४ मुलं आणि ५० शेजाऱ्यांना मी डंकी पाहण्याची परवानगी देणार नाही. एवढं नुकसान मी सहन करु शकत नाही. यावर शाहरुखने रिप्लाय केला की, भाई तू आधीच आयुष्यात इतका व्यस्त आहेस तर दुसरी कामं करायला तुला वेळ अजिबात मिळणार नाही. कृपया तुझ्या बायको - मुलांसोबत वेळ काढ. मुलांसोबत खेळ आणि बायकोसोबत सिनेमा पाहायला जा. बॉलीवूडचा बादशाह शाहरुख खान सध्या त्याच्या हिट सिनेमांमुळे चर्चेत आहे. त्याने या वर्षी बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला . 'जवान' आणि 'पठाण' अशा हजार कोटींचे कलेक्शन करणाऱ्या चित्रपटांनंतर आता सर्वांच्या नजरा शाहरुख खानच्या 'डंकी' या चित्रपटाकडे लागल्या आहेत. शाहरुख सध्या डंकी निमित्ताने ट्विटरवर #ASKSRK निमित्ताने चाहत्यांच्या संपर्कात असतो. 'डंकी' हा चित्रपट शाहरुखचा या वर्षातील तिसरा मोठा आणि बहुप्रतिक्षित असल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे राजकुमार हिरानी दिग्दर्शित या चित्रपटात तापसी पन्नू आणि विकी कौशल सारखे लोकप्रिय कलाकारही आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकणार आहे.

## इलियाना डिक्रूझ घेणार अभिनय क्षेत्रातून संन्यास?



बॉलीवूड अभिनेत्री इलियाना डिक्रूझ ही गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. इलियाना एका गोंडस मुलाची आई झाली आहे. तिने तिच्या मुलाचे नाव कोआ फेनिक्स डोलन ठेवलं आहे. ती सध्या मुलासोबत वेळ घालवत आहे. सध्या ती चित्रपटात सक्रिय नसली तरी ती सोशल मिडियाच्या माध्यमातून चाहत्यांसोबत कनेक्ट राहते. इलियाना तिच्या मुलाचे अनेक फोटो सोशल मीडियावर चाहत्यांसोबत शेअर करत असत. तिने मे महिन्यात मायकेल डोलनशी लग्न केल्याच्या चर्चा आहे. ती लग्नाआधीच गरोदर होती. मात्र आता रिपोर्ट्समध्ये दावा करण्यात येत आहे की, इलियाना आता यूएसएला जाण्याचा विचार करत आहे. त्यामुळेच ती कोणत्याही चित्रपटाची ऑफर स्वीकारत नाहीये. इलियानाला तिच्या फॅमिलीवर लक्ष केंद्रित करायचे आहे. त्यामुळे आता ती पुन्हा बॉलिवूडमध्ये काम करणार नसल्याचे सांगितले जात आहे. मात्र याबाबत इलियानाने स्वत: काही प्रतिक्रिया दिलेली नाही. इलियाना डिक्रूझच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचं झालं तर तिने आपल्या करिअरची सुरुवात मॉडेलिंगपासून केली, वयाच्या अवघ्या 19 व्या वर्षी इलियानाने दक्षिण चित्रपटांमध्ये पदार्पण केले. यानंतर तिने रणबीर कपूर आणि प्रियांका चोप्रासोबत 'बर्फी' चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. 'रुस्तम', 'रेड', 'मैं तेरा हिरो', 'पागलपंती' सारख्या अनेक चित्रपटांमध्ये इलियानाने काम केले आहे. इलियानाने 1 ऑगस्ट 2023 रोजी मुलाला जन्म दिला आहे. आता ती त्याच्यासोबत वेळ घालवत आहे.बॉलीवूड अभिनेत्री इलियाना डिक्रूझ ही गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. इलियाना एका गोंडस मुलाची आई झाली आहे. तिने तिच्या मुलाचे नाव कोआ फेनिक्स डोलन ठेवलं आहे.

# आयपीएलचा सर्वात रोमांचक मुकाबला!

## » शुभमन गिल सर्वात तरुण, तर धोनी सर्वात वयस्कर कॅप्टन!

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था




**इंडियन प्रीमियर लीगच्या (IPL) येत्या हंगामाची तयारी आतापासूनच सुरू झाली आहे. गेल्या आठवड्यात सर्व संघांनी रिलीज आणि कायम ठेवलेल्या खेळाडूंच्या याद्या जाहीर केल्या. अनेक बड्या खेळाडूंना फ्रँचायझीने बाहेरचा रस्ता दाखवला. तसेच अनेक खेळाडूंची आपापसात खरेदी-विक्री झाली. रिटेन्शन लिस्ट जाहीर झाल्यानंतर, सर्व फ्रँचायझींनी या महिन्यात 19 डिसेंबर रोजी होणाऱ्या मिनी लिलावाची तयारी सुरू केली आहे. दुबई येथे होणाऱ्या या मिनी लिलावात एकूण 1166 खेळाडूंनी आपली नोंदणी केली आहे. यात शेकडो भारतीय आणि परदेशी खेळाडूंसह अनेक सुपरस्टार्सचा समावेश आहे, ज्यांच्यावर सर्व फ्रँचायझी करोडो रुपयांची बोली लावतील.**

हार्दिक पांड्याने गुजरातचा कॅप्टन असूनही मुंबईचा रस्ता पकडल्याने बरीच चर्चा झाली. मुंबईने त्याला रोख रक्कम मोजत खरेदी केल्याची चर्चा आहे. यासाठी 15 कोटी मोजल्याची सुद्धा चर्चा आहे. यामुळे गुजरातची कमान टीम इंडियाचा प्रिन्स गुजरातचा सलामीवीर शुभमन गिलकडे गेली आहे. गिल अवघ्या 24 वर्षांचा आहे. त्यामुळे ज्याच्याकडे टीम इंडियाचा कॅप्टन म्हणून पाहिलं जात आहे तो या आयपीएलमध्ये कशी कामगिरी करतो, याकडे लक्ष असेल. दुसरीकडे, या आयपीएलमध्ये खेळण्यावर धोनीकडून शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे. तो नेहमीप्रमाणे चेन्नईचा सेनापती असेल. धोनी सध्या 42 वर्षांचा असून तो आयपीएलमधील सर्वात वयस्कर कॅप्टन असेल. याच धोनीसमोर गिलची प्रतिभेचा कस लागणार आहे. इतकंच नव्हे, तर धोनी यापूर्वी सचिन तेंडुलकर, विराट कोहली आणि गिलविरुद्ध कॅप्टन असेल. त्यामुळे तिसरी पिढी धोनीसमोर असणार आहे. दुसरीकडे, आयपीएलच्या पुढील हंगामासाठी या मिनी लिलावात एकूण 830 भारतीय खेळाडूंनी आपली नावे नोंदवली आहेत. त्यात शार्दुल ठाकूर, हर्षल पटेल, उमेश यादव, मनीष पांडे, वरुण आरोन, केएस भरत, केदार जाधव, सिद्धार्थ कौल, धवल कुलकर्णी, शिवम मावी, शाहबाज नदीम, करुण नायर, चेतन साकारिया, मनदीप सिंग, बरिंदर सरन, जयदेव उनाडकट, जयदेव उनाड यांचा समावेश आहे. हनुमा विहारी आणि संदीप वॉरियर सारख्या कॅप्ड खेळाडूंसह अनेक तरुण प्रतिभावान खेळाडूंचा समावेश आहे. या मिनी लिलावात केवळ भारतीय खेळाडूच नाही तर परदेशी सुपरस्टार्सवरही करोडो रुपयांचा वर्षाव होणार आहे. या लिलावासाठी एकूण 336 परदेशी खेळाडूंनी आपली नावे नोंदवली आहेत. यात ट्रॅव्हिस हेड, रचिन रवींद्र, मिचेल स्टार्क, पॅट कमिन्स, डॅरिल मिशेल, हॅरी ब्रूक, आदिल रशीद, डेव्हिड मलान आणि टॉम कुरन, ख्रिस जॉर्डन, बेन डकेट, फिलिप सॉल्ट, टॉम बँटन आणि सॅम यांसारखे अनेक परदेशी सुपरस्टार्स आहेत. मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगलोरच्या संघाने पुढील हंगामासाठी कायम ठेवण्याची यादी जाहीर करताना, त्यांच्या सुपरस्टारला सोडण्याचा निर्णय घेऊन सर्वांना आश्चर्यचकित केले. मुंबई संघाने जोफ्रा आर्चरला सोडले तर बंगळूरने वानिंदू हसरंगाला सोडले होते. या दोन्ही सुपरस्टार्सनी या मिनी लिलावात आपली नोंदणी केलेली नाही.हार्दिक पांड्याने गुजरातचा कॅप्टन असूनही मुंबईचा रस्ता पकडल्याने बरीच चर्चा झाली. मुंबईने त्याला रोख रक्कम मोजत खरेदी केल्याची चर्चा आहे. यासाठी 15 कोटी मोजल्याची सुद्धा चर्चा आहे.

### धोनी सध्या 42 वर्षांचा

» गुजरातची कमान टीम इंडियाचा प्रिन्स गुजरातचा सलामीवीर शुभमन गिलकडे गेली आहे. गिल अवघ्या 24 वर्षांचा आहे. त्यामुळे ज्याच्याकडे टीम इंडियाचा कॅप्टन म्हणून पाहिलं जात आहे तो या आयपीएलमध्ये कशी कामगिरी करतो, याकडे लक्ष असेल. दुसरीकडे, या आयपीएलमध्ये खेळण्यावर धोनीकडून शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे. तो नेहमीप्रमाणे चेन्नईचा सेनापती असेल. धोनी सध्या 42 वर्षांचा असून तो आयपीएलमधील सर्वात वयस्कर कॅप्टन असेल. इंडियन प्रीमियर लीगच्या (IPL) येत्या हंगामाची तयारी आतापासूनच सुरू झाली आहे.

# मोहम्मद शमी सुद्धा तगडा निर्णय घेण्याच्या तयारीत

## » शमी मर्यादित षटकांच्या फॉरमॅटमध्ये दिसणार का?

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज









**नुकत्याच पार पडलेल्या विश्वचषकात (WORLD CUP) टीम इंडियाचा रॉकस्टार मोहम्मद शमीने (MOHAMMED SHAMI) उत्कृष्ट गोलंदाजीने विरोधी संघाची दैना करून टाकली होती. स्पर्धेत सर्वाधिक बळी घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत मोहम्मद शमी पहिल्या क्रमांकावर राहिला. तथापि, आगामी काळात मोहम्मद शमी मर्यादित षटकांच्या फॉरमॅटमध्ये टीम इंडियाच्या जर्सीमध्ये (MOHAMMED SHAMI IN T-20 AND ONEDAY TEAM) दिसणार का? अशी चर्चा रंगली आहे. मात्र, तसं होण्याची शक्यता खूपच कमी आहे.**

'पीटीआय' वृत्तसंस्थेनुसार, मोहम्मद शमी घोट्याच्या दुखापतीने त्रस्त आहे. यामुळे तो वनडे आणि टी-20 फॉरमॅटमध्ये खेळू शकणार नाही. मोहम्मद शमी टी-20 वर्ल्ड कप 2024 (T-20 WORLD CUP) मध्ये खेळणार का? तथापि, असे मानले जात आहे की जर मोहम्मद शमीने आयपीएल 2024 (IPL 2024) च्या हंगामात चांगली कामगिरी केली तर तो T20 विश्वचषक संघाचा भाग होऊ शकतो.

पीटीआय या वृत्तसंस्थेनुसार, भारतीय संघ इंग्लंडविरुद्ध 5 कसोटी सामन्यांची मालिका खेळणार आहे, याशिवाय ऑस्ट्रेलियाविरुद्ध 2 कसोटी सामन्यांची मालिका खेळणार आहे. मोहम्मद शमी या मालिकेत खेळणार आहे, परंतु तो एकदिवसीय आणि टी-20 फॉरमॅटमध्ये टीम इंडियाचे प्रतिनिधित्व करेल अशी शक्यता फारच कमी आहे.

2023 च्या विश्वचषक स्पर्धेत मोहम्मद शमीने सर्वाधिक विकेट घेतल्या होत्या. या भारतीय वेगवान गोलंदाजाने 24 विकेट्स घेतल्या होत्या. मात्र, ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-20 मालिकेनंतर भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर जाणार आहे. या दौऱ्यावर भारतीय संघ प्रथम T20 सामन्यांची मालिका खेळणार आहे. यानंतर दोन्ही संघांमध्ये कसोटी सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिला कसोटी सामना डर्बन येथे खेळवला जाणार आहे. मोहम्मद शमीची या चाचणीसाठी निवड झालेली नाही. आगामी टी-20 विश्वचषकात मोहम्मद शमीच्या खेळण्यावर सध्या शंका आहे.

पण असे मानले जात आहे की जर मोहम्मद शमीने आयपीएल 2024 मध्ये चांगली गोलंदाजी केली तर टी-20 वर्ल्ड कप संघासाठी दरवाजे उघडू शकतात.नुकत्याच पार पडलेल्या विश्वचषकात (WORLD CUP) टीम इंडियाचा रॉकस्टार मोहम्मद शमीने (MOHAMMED SHAMI) उत्कृष्ट गोलंदाजीने विरोधी संघाची दैना करून टाकली होती. स्पर्धेत सर्वाधिक बळी घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत मोहम्मद शमी पहिल्या क्रमांकावर राहिला.

### शमी घोट्याच्या दुखापतीने त्रस्त

» तथापि, आगामी काळात मोहम्मद शमी मर्यादित षटकांच्या फॉरमॅटमध्ये टीम इंडियाच्या जर्सीमध्ये (MOHAMMED SHAMI IN T-20 AND ONEDAY TEAM) दिसणार का? अशी चर्चा रंगली आहे. मात्र, तसं होण्याची शक्यता खूपच कमी आहे. 'पीटीआय' वृत्तसंस्थेनुसार, मोहम्मद शमी घोट्याच्या दुखापतीने त्रस्त आहे. यामुळे तो वनडे आणि टी-20 फॉरमॅटमध्ये खेळू शकणार नाही. मोहम्मद शमी टी-20 वर्ल्ड कप 2024 (T-20 WORLD CUP) मध्ये खेळणार का? तथापि, असे मानले जात आहे की जर मोहम्मद शमीने आयपीएल 2024 (IPL 2024) च्या हंगामात चांगली कामगिरी केली तर तो T20 विश्वचषक संघाचा भाग होऊ शकतो.